| CNRNo.MHWR040008782020 | नोंदणी तारिख | ०४/११/२०२० |
|---|---|---|
| | दाखल तारिख | ०४/११/२०२० |
| | निकाल तारिख | १८/०७/२०२६ |
| | कालावधी | ०५ वर्षे, ०८ म, १४ दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः १८/०७/२०२६)

आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ), ८३ व साथीचे रोग अधिनियम १८९७ चे कलम २, ३ व ४ अन्वये अपराधाच्या आरोपांसाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपींतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक २८/०७/२०२० रोजी वेळ १४.३० ते १५.१५ वाजताचे सुमारास विकास चौक, सेलू, तालुका–सेलू व जिल्हा–वर्धा, येथे आरोपींनी आपसी संगनमताने आरोपी क्र.१ च्या युनिक रेस्टोरेंट सेलु येथे विदेशी दारुची विक्री करीत असतांना आरोपी क्र.२ च्या ताब्यातुन एका प्लास्टीक चुंगळीमध्ये ऑफिसर चॉईस कंपनीच्या प्रत्येकी १८० एम.एल.च्या विदेशी दारुने भरलेल्या एकुण ५५ सिलबंद शिश्या, मॅकडॉल नंबर १ | : | नकारार्थी |

नाही. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देऊन मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविते.

**मुद्दा क्रमांक २ बाबत :**

९. वरील मुद्दांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हे त्यांच्यावर ठेवलेल्या आरोपांमधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणाचा विचार करता, मी मुद्दा क्रमांक २ च्या निष्कर्षात,खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ **सनी संजय खोडे** व आरोपी क्र.२ **शेख कलीम शेख यासीन** यांची महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ), ८३ व साथीचे रोग अधिनियम १८९७ चे कलम २, ३ व ४ च्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्रक रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ] प्रमाणे प्रत्येकी रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

४. अपराध क्रमांक ३१३/२०२० मधील जप्त मुद्देमाल ऑफिसर चॉईस कंपनीच्या प्रत्येकी १८० एम.एल.च्या विदेशी दारुने भरलेल्या एकुण ५५ सिलबंद शिश्या, मॅकडॉल नंबर १ कंपनीच्या प्रत्येकी १८० एम.एल.च्या विदेशी दारुने भरलेल्या एकुण १५ सिलबंद शिश्या, ऑफिसर चॉईस ब्लु कंपनीच्या प्रत्येकी १८० एम.एल.च्या विदेशी दारुने भरलेल्या एकुण १५

